क्रमांक : ११

# महाराष्ट्र विधानपरिषद
## पत्रक भाग दोन
## गुरुवार, दिनांक १७ फेब्रुवारी, २०२२ / २८ माघ, १९४३ शके

संदर्भ : महाराष्ट्र विधानपरिषद पत्रक भाग दोन क्रमांक ७/७ दि.२४ जानेवारी,२०२२

११. लक्षवेधी सूचना स्वीकारण्याबाबत सर्व सन्माननीय सदस्यांना कळविण्यात येते की :-

(१) महाराष्ट्र विधानपरिषदेच्या गुरुवार, दिनांक ३ मार्च, २०२२ पासून विधान भवन, मुंबई येथे सुरु होणाऱ्या सन २०२२ च्या पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशनासाठी द्यावयाच्या लक्षवेधी सूचना पूर्णत: एम.ओ.आय.एस. (MOIS) या संगणक प्रणालीवर ONLINE पध्दतीने बुधवार, दिनांक २३ फेब्रुवारी, २०२२ पासून सकाळी ११.०० ते सायंकाळी ०५.०० वाजेपर्यन्त स्वीकारण्यात येतील.

(२) ONLINE पध्दतीने प्राप्त होणाऱ्या लक्षवेधी सूचनांना संगणकीय प्रणालीव्दारे आपोआपच अनुक्रमाने नोंदणी क्रमांक दिला जाईल.

(३) मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांनी दिनांक ६ जानेवारी, २०२२ रोजीच्या बैठकीत दिलेल्या निदेशानुसार महाराष्ट्र विधानपरिषद नियम १०१ अन्वये द्यावयाच्या लक्षवेधी सूचनेचा विषय हा निकडीचा, सार्वजनिक महत्वाचा, स्पष्ट, मुद्देसूद व एकाच विभागाशी संबंधित असणे आवश्यक आहे. तसेच लक्षवेधी सूचनेचे प्रारूप १५० ते १७५ शब्दांचे असावे. ऑफलाईन पध्दतीने दिलेल्या लक्षवेधी सूचना ग्राह्य धरण्यात येणार नाहीत.

(४) अधिवेशन संस्थगित होण्यापूर्वीचे कार्यालयीन कामकाजाचे पूर्ण ३ दिवस अगोदरचा दिवस हा ONLINE पध्दतीने लक्षवेधी सूचना स्विकारण्यासाठी अंतिम दिवस असेल.

(५) लक्षवेधी सूचना, स्वीकृती संबंधी व स्वीकृत सूचना चर्चेला घेण्यासंबंधीचा संपूर्ण अधिकार हा मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचाच राहील. याची कृपया नोंद घेण्यात यावी.

विधान भवन,
मुंबई,
दिनांक : १७ फेब्रुवारी, २०२२

राजेन्द्र भागवत,
प्रधान सचिव
महाराष्ट्र विधानपरिषद

..२/-

**याची प्रत :-**

(१) महाराष्ट्र विधानरिषदेचे सर्व सन्माननीय सदस्य
(२) मा.सभापती व मा.उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे सचिव/खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी
(३) मा.विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी
(४) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व अधिकारी
(५) मुख्य सुरक्षा अधिकारी, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
(६) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व पक्ष कार्यालय
(७) मालमत्ता व्यवस्थापक, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
(८) संगणक कक्ष **(WEBSITE)**
(९) एम.के.सी.एल कक्ष **(MKCL)**